नि. फौ. ख. क्र. १६१/२०१७
सरकार – विरुध्द – अशोक गवळी आणि इतर

CNR-MHDH05-001394-2017

## निशाणी क्र. ४३ वर आदेश

अर्ज व त्यावरील सहायक सरकारी अभियोक्ता यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा आरोपींतर्फे आजचे कामकाज तहकूब होऊन मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. आरोपी यांचे थोडक्यात कथन की, सदरचा खटला हा आज रोजी चौकशीवर होता. परंतु काही महत्वाचे दस्तावेज उपलब्ध झालेले नाहीत, त्यामुळे सदरचा खटला आज रोजी चालविणे शक्य नाही. तरी आजचे चौकशीचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जावर अभियोग पक्षातर्फे हरकत घेण्यात आली. सदरील आरोपी यांना यापुर्वी वारंवार संधी देण्यात आली आहे. आरोपी यांना दोषारोपपत्राची प्रत या आधीच देण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जात नमुद कारण विश्वासहार्य नाही. करीता सदरी अर्ज मंजुर केल्यास साक्षीदार यांचा सरतपास झाला आहे. सबब सदरील साक्षीदार यांना रुपये ३,०००/– भत्ता देण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. प्रकरण हे सन २०१७ चे आहे. यामध्ये एकूण सहा आरोपी आहेत. त्यापैकी तीन आरोपी हे विधीसंघर्षीत बालक आहेत. प्रकरणात आरोपी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द दिनांक २८.०८.२०१८ रोजी दोषारोप निश्चित करण्यात आले. त्यानंतर प्रकरण हे पुराव्यासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर दिनांक १८.०७.२०२२ रोजी एक साक्षीदार तपासण्यात आला. त्यानंतर नि.क्र. ३८ अन्वये दिनांक २०.०९.२०२२ रोजी आरोपी

यांचेतर्फे कामकाज तहकुब होऊन मुदत मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला. त्यानंतर प्रकरण हे दिनांक २०.१०.२०२२ पावेतो तहकुब करण्यात आले होते. त्या दिवशी देखील आरोपी यांचेतर्फे प्रकरण तहकूब होऊन मिळणेसाठी अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा अर्ज न्यायालयाने रुपये ७००/– च्या शास्तीवर मंजुर केला. त्यानंतर प्रकरण हे आज पावेतो तहकूब करण्यात आले. आज प्रकरणात अभियोग पक्षातर्फे फिर्यादी यांचा सरतपास घेण्यात आला. सरतपास घेतल्यानंतर आरोपी यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला. आरोपी यांना माहित आहेच की, प्रकरण हे पुराव्यावर आहे. अर्जात कारण हे महत्वाचे दस्तावेज उपलब्ध झाले नाही, असे नमुद आहे. अर्जातील कारण सबळ नाही.

**५.** मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होता. न्यायालयीन कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

**६.** अर्ज नामंजुर केल्यास, आरोपी यांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे, कारण त्यांची संधी डावलली जाईल. त्यामुळे साक्षी भात्त्यावर अर्ज मंजुर करावा असे मला वाटते. सबब एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

- अर्ज हा रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार मात्र) साक्षीभत्ता यावर मंजुर करण्यात येतो.
- सदरची साक्षी भत्ता साक्षीदारांना देण्यात यावा.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.11.30 16:39:51 +0530

साक्री

दिनांक : ३०.११.२०२२

**( रा.भा.डोळे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री

: **<u>प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – ३०.११.२०२२.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३